प्रकरण पाचवे

कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचे दोष, समस्या व त्यावरील उपाय :-

या प्रकरणात कवठे महांकाळ तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या मजूर सहकारी संस्थांच्या दोषांचा, समस्यांचा आणि त्यावरील उपायांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

मजूर सहकारी संस्थांचे दोष व उपाय :-

१. सभासद संख्या कमी :-

मजूर सहकारी संस्था कार्यक्षम राहण्यासाठी मजूर सहकारी संस्थेमध्ये किमान ५० सभासद असावेत असे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या १९ एप्रिल १९८५ च्या परिपत्रकामध्ये सांगितले आहे परंतु कवठे महांकाळ तालुक्यातील मी अभ्यास केलेल्या १० मजूर सहकारी संस्थांमध्ये १९८३-८४ ते १९८७-८८ या वर्षात सरासरी सभासद संख्या ५० च्या आत असून ती प्रत्येक वर्षी सातत्याने कमी होत गेलेली आहे. तरी या संस्थांनी आपली सभासद संख्या जास्तीत जास्त प्रमाणात वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

२. एकूण सभासदांमध्ये मागास वर्गीय मजूर सभासदांचे प्रमाण अल्प :-

ग्रामीण भागातील एकूण मजूरांमध्ये भूमिहीन, शेतमजूर, सीमांत शेतकरी, मागास वर्गीय इ. चा समावेश होतो. यामध्ये देखील मागासवर्गीयांचे प्रमाण अधिक असते. यासाठी त्यांना नियमित रोजगार मिळण्यासाठी मागासवर्गीय

मजूरांना मजूर सहकारी संस्थांमधून अधिक प्रमाणात सभासद करून घेतले पाहिजे, परंतु कवठेमहांकाळ तालुक्यातील या मजूर सहकारी संस्थांमध्ये १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीत एकूण सभासदांपैकी २३ टक्यापेक्षा कमी मागासवर्गीय सभासद असलेले दिसतात म्हणून या संस्थांनी आपली एकूण सभासद संख्या वाढवून त्यामध्ये मागासवर्गीय मजूरांना अधिक प्राधान्य द्यावे.

३. मजूर सहकारी संस्थांच्या राखीव निधीत वाढ नाही. :-

सहकाराच्या कायद्यानुसार मजूर सहकारी संस्थांना राखीव निधी निर्माण करावा लागतो व या राखीव निधीत या संस्थांना प्रतिवर्षी होणा-या निव्वळ नफ्यापैकी २५ टक्के रक्कम ठेवावी लागते. कवठे महांकाळ तालुक्यातील या मजूर सहकारी संस्थांनी सहकारी नियमानुसार राखीव निधीत रक्कम ठेवलेली दिसून येत नाही. परंतु सहकारी कायद्याचे पालन करण्यासाठी व भविष्य काळातील आर्थिक संकटांना तोंड देण्यासाठी या मजूर सहकारी संस्थांनी सहकारी नियमाप्रमाणे राखीव निधीत रक्कम ठेवून राखीव निधी वाढविला पाहिजे.

४. कामावर घेण्यात आलेल्या एकूण मजूरांमध्ये सभासद मजूरांपेक्षा बिगर सभासद मजूरांचे प्रमाण अधिक :

या मजूर सहकारी संस्थांनी कामावर घेतलेल्या एकूण मजूरांमध्ये बिगर सभासद मजूरांचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे या संस्थांचा फायदा सभासद मजूरांपेक्षा बिगर सभासद मजूरांनाच अधिक झालेला दिसतो. तरी या मजूर सहकारी संस्थांनी त्यांना मिळालेली कामे पूर्ण करण्यासाठी आपल्या संस्थांची सभासद संख्या वाढवून सभासद मजूरानांच कामे द्यावीत, किंवा

कामावरील बिगर सभासद मजूरांना संस्थांचे सभासद करून घेण्यात यावे.

५. मजूर सहकारी संस्थानी होणा-या नफ्याची वाटणी केलेली नाही:-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यानुसार मजूर सहकारी संस्थांचा जो उप-विधी तयार केलेला आहे, त्यातील अधिनियम कलम क्रमांक ६४ ते ६९ व नियम क्रमांक ५० ते ५२, ५३ व ५५ मधील तरतुदीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी करावी लागते. परंतु या मजूर सहकारी संस्थांनी त्यांना झालेल्या निव्वळ नफ्याची वाटणी १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीत केलेली दिसत नाही. तरी या मजूर सहकारी संस्थांनी त्यांना होणा-या निव्वळ नफ्याची विभागणी सहकारी नियमानुसार करावी.

मजूर सहकारी संस्थांच्या समस्या व उपाय :-

प्रकरण चार मध्ये सांगण्यात आलेल्या मजूर सहकारी संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाय हे बहुतांशाने कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांच्या बाबतीत लागू होतात असे दिसून येते. तरीही प्रकरण तीन मधील कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांच्या केलेल्या अभ्यासावरून कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांच्या पुढील काही समस्या दिसून येतात. या समस्या लक्षात घेऊन त्यावर काही उपाय सुचविण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.

१. कमी सभासद संख्या :-

कवठे महांकाळ तालुक्यातील या मजूर सहकारी संस्थांच्या विकासातील एक महत्वाची समस्या म्हणजे या संस्थांची सभासद संख्या अत्यंत कमी आहे.

या तालुक्यातील मजूर अतिशय गरीब असल्याने ते संस्थांचे भाग घेऊ शकत नाहीत. तसेच ग्रामीण भागातील मजूरांचा अशिक्षितपणा, स्थानिक राजकारण, सामाजिक दबाव आणि खाजगी कंत्राटदारांचा मजूरांच्यावरील दबाव यामुळे या मजूर सहकारी संस्थांची सभासद संख्या अतिशय कमी आहे. परंतू या मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी प्रत्येक मजूर सहकारी संस्थेची सभासद संख्या किमान ५० तरी करणे गरजेचे आहे व त्यादृष्टीने या संस्थांनी तसेच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२. <u>मजूर सहकारी संस्थांचे सभासद अशिक्षित व अज्ञानी :-</u>

या मजूर सहकारी संस्थांच्या विकासात एक महत्वाचा आडथळा निर्माण झालेला आहे तो म्हणजे या संस्थांचे सभासद प्रामुख्याने ग्रामीण भागातील असल्याने ते अशिक्षित व अज्ञानी आहेत. त्यामुळे त्यांना सहकाराची तत्वे, मजूर सहकारी संस्थांचे उद्देश, महत्व आणि फायदे यांची कल्पना नाही, परिणामता या सभासदांचे मजूर सहकारी संस्थांना सहकार्य मिळत नाही. यासाठी मजूर सहकारी संस्थांच्या पदाधिका-यांनी आपल्या जिल्हा किंवा राज्य मजूर सहकारी संस्थांच्या संघामार्फत सभासद मजूरांना सहकाराचे शिक्षण द्यावे. यामुळे सभासदांना सहकाराचे महत्व समजेल व त्यांच्यामध्ये सहकार्याची भावना निर्माण होईल.

३. <u>मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांच्या ओळखपत्राचे नूतनीकरण :-</u>

३ सप्टेंबर १९८७ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांना ओळखपत्र देण्याची अट घालण्यात आली आहे या ओळखपत्रावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांची स्वाक्षरी राहील व हे ओखपत्र एका वर्षासाठी असेल व या ओळखपत्राची दर तीन महिन्यांनी तपासणी करण्यात येईल. यामुळे वेळेचा अपव्यय तर होणारच आहे व पण वादाचा मुद्दा निर्माण होण्याची शक्यता आहे.

ही मजूर सहकारी संस्थांची आडचण सोडवून वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी मजूर सहकारी संस्थेच्या लेखा परीक्षणाच्या वेळी लेखा परीक्षकाने ओळखपत्राची नव्याने तपासणी करून योग्य असतील त्या सभासदांच्या ओळखपत्राचे नूतनीकरण केल्याची नोंद ओळखपत्रावर करावी.

४. मजूर सहकारी संस्थेतून काम न करणा-या सभासदांना कमी करण्याच्या आदेशामुळे निर्माण झालेली समस्या :-

३ सप्टेंबर १९८७ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांमध्ये प्रत्यक्ष मजुरीचे काम न करणारे जे सभासद असतील त्यांना कमी करावे अशी अट घालण्यात आली आहे. पण ही अट सभासदावर अन्याय करणारी आहे. कारण मजूर सहकारी संस्थेचे पदाधिकारी मजूर सहकारी संस्थेसाठी कामे उपलब्ध करून देण्याच्या कामात असतात. जबाबदारीने घेतलेले काम पूर्ण करणे, ते काम पूर्ण होईपर्यन्त संबंधित खात्यांशी संपर्क ठेवणे, भांडवल उपलब्ध करून देणे अशी विविध कामे पदाधिका-यांना करावी लागतात. त्यामुळे काम न करणा-या सभासदांना मजूर सहकारी संस्थेतून कमी करणे ही अट निश्चितच जाचक आहे. म्हणून या नियमात बदल करून मजूर सहकारी संस्थांच्या कामासाठी मजूर सहकारी संस्थांमध्ये प्रत्यक्ष मजुरीचे काम न करणा-या किमान २ [दोन] सभासदांचा अंतर्भाव करावा.

५. मजूर सहकारी संस्थांचे कमी भागभांडवल :-

कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचे सभासद आर्थिकदृष्टया

दुर्बल असल्याने ते या संस्थांचे अधिक प्रमाणात भाग घेऊ शकत नाहीत. त्यामुळे या संस्थांचे भागभांडवल अत्यंत कमी आहे. परंतु या मजूर सहकारी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी प्रत्येक संस्थेकडे किमान ५० सभासद आणि ५०,००० रुपये भागभांडवल असावे. त्यापैकी सरकारने ७५ % भाग भांडवल कर्जाच्या स्वरुपात द्यावे व २५ % [१२,५०० रु.] भाग भांडवल प्रत्येकी २५० रु. याप्रमाणे सभासद मजूरांनि द्यावे.

६. मजूर सहकारी संस्थांकडे अपुरे खेळते भांडवल :-

या मजूर सहकारी संस्थांना कामे देणा-या खात्यांच्याकडून कामाची बिले, त्या कामाच्या मुदतीमध्ये मिळण्यास दिरंगाई होत असल्याने या मजूर सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. यासाठी कामे देणा-या खात्यांनी कामांच्या मुदतीमध्ये मजूर सहकारी संस्थांना कामाची बिले द्यावीत म्हणजे मजूर सहकारी संस्थांचे खेळते भांडवल वाढेल व या संस्थांना त्यांची कामे मुदतीमध्ये पूर्ण करता येतील व मजूरांना वेळेवर मजुरी देता येईल.

७. कवठे महांकाळ तालुक्यात अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांचे अस्तित्व :-

५ डिसेंबर १९८४ च्या शासन निर्णयानुसार अ, ब आणि क या वर्गीकृत मजूर सहकारी संस्थांना निविदा न मागविता काम देणा-या खात्यांकडून अनुक्रमे २ लाख, १ लाख आणि ५० हजार रुपयापर्यन्तची कामे दिली जातात. परंतु कवठे महांकाळ तालुक्यात १९८७-८८ मध्ये एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी १८.७५ % मजूर सहकारी संस्था अवर्गीकृत असलेल्या दिसतात. म्हणजे या संस्थांना कामाच्या निविदा भराव्या लागतात. त्याचा परिणाम यामजूर सहकारी संस्थांच्या आर्थिक परिस्थितीवर होतो. म्हणून या अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांनी आपले वर्गीकरण करून घ्यावे. त्यामुळे त्यांना कोणता तरी एखादा वर्ग मिळून त्यांना निविदा न भरता त्या विशिष्ट किंमती पर्यन्तचे काम मिळू शकेल. परिणामत: कांही प्रमाणात या संस्थांची आर्थिक समस्या सुटण्यास मदत होईल.

८. **मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या वर्गवारीनुसार मिळणा-या कामाच्या किंमतीबाबतची अडचण :-**

५ डिसेंबर १९८४ च्या शासन निर्णयानुसार या मजूर सहकारी संस्थांना २ लाख रूपयापर्यन्तची जास्तीत जास्त ३ कामे द्यावीत असा आदेश आहे. परंतु सध्या बांधकामावर वापरण्यात येणा-या मालाचे व मजुरीचे दर सातत्याने वाढत असल्याने मजूर सहकारी संस्थांना खरे म्हणजे कमी किंमतीची कामे मिळत आहेत असेच म्हणावे लागते. यासाठी सध्याचे मालाचे व मजुरीचे दर लक्षात घेऊन मजूर सहकारी संस्थांना ही मर्यादा "अ" वर्गासाठी २ लाख रूपयाऐवजी ४ लाखापर्यन्त " ब " वर्गासाठी १ लाख रूपयाऐवजी २ लाखापर्यन्त व "क" वर्गासाठी ५० हजार रूपयाऐवजी १ लाख रूपयापर्यन्त करण्यात यावी व कामाचे वाटप करताना ते कामांच्या संख्येवर न ठरविता कामांच्या किंमतीनुसार करण्यात यावे.

९. **मजूर सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या जवळपास कामांचा अभाव दिसून येतो :-**

कवठे महांकाळ तालुक्यातील या मजूर सहकारी संस्थांना कामे देणा-या खात्यांच्याकडून जी कामे दिली जात आहेत ती कामे या संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या जवळपास असलेली दिसत नाहीत. त्यामुळे या मजूर सहकारी संस्थांच्या विकासात अडचण निर्माण झालेली आहे. जरी या मजूर सहकारी संस्थांना दुस-या ठिकाणी कामे उपलब्ध झाली तरी ती समाधानकारक होऊ शकत नाहीत. कारण त्या ठिकाणी या संस्थांचे सभासद मजूर जाण्यास तयार नसतात. त्यामुळे मजूरांचा पुरवठा वेळेवर होत नाही. यासाठी शक्यतो कामे देणा-या खात्यांनी कामाच्या उपलब्धतेनुसार विशिष्ट भागातील कामे त्या भागातील मजूर सहकारी संस्थांनाच द्यावीत.

१०. मजूर सहकारी संस्थांना कामे मिळण्यामधील अडचणी :-

शासन निर्णय दिनांक ३० मार्च १९७९ व ५ डिसेंबर १९८४ नुसार २ लाख रुपयांच्या आतील सर्व कामे मजूर सहकारी संस्थांना वाटपासाठी पाठविली जात नाहीत. त्याच बरोबर कामे देणा-या खात्यांच्याकडून सर्व कामांचे एकत्रिकरण करून ती २ लाख रुपयांच्यावर दाखवून त्यांच्या निविदा काढल्या जातात. या पध्दतीमुळे कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांना कामे देणा-या खात्यांच्याकडून २ लाख रुपयांच्या आतील कामे मिळण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच सर्व कामांचे एकत्रीकरण करून ती कामे २ लाख रुपयांच्यावर दाखविल्याने या संस्थांना कामे मिळविण्यासाठी कामांच्या निविदा भराव्या लागतात.

ही समस्या दूर करण्यासाठी शासन निर्णय ३० मार्च १९७९ व ५ डिसेंबर १९८४ च्या आदेशाचे पालन काटेकोरपणे संबंधित कामे देणा-या यंत्रणांकडून होत नाही. म्हणून मंत्रालय पातळीवरून संबंधित विभागाकडून त्यांच्या अखत्यारीतील कामे देणा-या सर्व यंत्रणांना या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतचे आदेश पुन्हा देण्यात यावेत.

११. कामे देणा-या खात्यांच्याकडून मजूर सहकारी संस्थांना सहकार्य नाही :-

या मजूर सहकारी संस्थांना विविध अशा सरकारी, निमसरकारी विभागाकडून कामे दिली जातात. उदा. सार्वजनिक बांधकाम, रोजगार हमी योजना, लघु पाटबंधारे, सांगली जिल्हा परिषद बांधकाम विभाग, छोटे पाटबंधारे विभाग, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ इ. कडून असे असले तरी कवठे महांकाळ तालुक्यातील ब-याच मजूर सहकारी संस्थांची अशी तक्रार आहे की सरकारी आणि निमसरकारी खात्यांचे अधिकारी कामे देण्याच्या बाबतीत सहकार्य करीत नाहीत. याउलट त्यांचा कामे देण्याच्या बाबतीत सहानुभूतीचा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

दृष्टीकोन खाजगी कंत्राटदारांच्या बाबतीत आहे. तसेच या तालुक्यातील दुस-या सहकारी संस्था सुध्दा [उदा. सहकारी साखर कारखाना] या मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या कडील कामे देण्याच्या बाबतीत सहकार्य करीत नाहीत. परंतु यासाठी असा एखादा प्रयत्न केला गेला पाहिजे की या खात्यांच्याकडून काही प्रमाणात मजूर सहकारी संस्थांना सक्तीने कामे दिली गेली पाहिजेत.

१२. मजूर सहकारी संस्थांना मंजूर केलेल्या कामाच्या किंमतीच्या २० % अग्रीम मिळण्याबाबतची अडचण :-

सध्याच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कामाच्या किंमतीच्या २० % अगर १५,००० रू. रक्कम काम देणा-या खात्यांच्याकडून मजूर सहकारी संस्थांना बिनव्याज देण्याची पध्दत आहे. मात्र अशी अग्रीम स्वरूपात रक्कम मिळविण्याची कार्यपध्दती किचकट व अवघड स्वरूपाची आहे. यामुळे कवठे महांकाळ तालुक्यातील ब-याच मजूर सहकारी संस्थांना अग्रीमच्या स्वरूपात रक्कम मिळविता आलेली नाही. परंतु काही प्रमाणात खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या कामांच्या किंमतीच्या २० % किंवा २०,००० रू. रक्कम बिनव्याजी अग्रीम म्हणून मिळावी, त्यासाठी ही योजना कायमस्वरूपी असावी आणि अग्रीम मंजूरीची सध्याची कार्यपध्दती अधिक सुलभ करून मजूर सहकारी संस्थांना या सवलतीचा लाभ मिळावा.

१३. कार्यक्षम व पूर्णवेळ व्यवस्थापकीय कर्मचा-यांचा अभाव :-

मजूर सहकारी संस्थांचे दैनंदीन व्यवहार पहाण्यासाठी, कामाचे पूर्व नियोजन करण्यासाठी, कामांची बिले वेळेत पूर्ण करण्यासाठी, मजूरांची मजुरी नियमितपणे देण्यासाठी कार्यक्षम व पूर्णवेळ व्यवस्थापकीय कर्मचा-यांची आवश्यकता असते. परंतु

कवठे महांकाळ तालुक्यातील बहुतांश मजूर सहकारी संस्थांच्याकडे कार्यक्षम व पूर्णवेळ कर्मचा-यांचा अभाव असलेला दिसून येतो. कारण या मजूर सहकारी संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या मजूरांनी स्थापन केलेल्या असल्याने या संस्थांना अधिक पगार देऊन कार्यक्षम, कुशल व पूर्णवेळ व्यवस्थापकीय कर्मचा-यांची नियुक्ती करणे अडचणीचे होत आहे. तरी देखील या मजूर सहकारी संस्था व्यावसायिक संस्था असल्याने या मजूर सहकारी संस्थांनी पगाराची अडचण न सांगता ती एक गुंतवणूक आहे असे समजून योग्य त्या पात्रतेच्या कार्यक्षम व पूर्णवेळ कर्मचा-यांची नियुक्ती केली पाहिजे.

१४. मजूर सहकारी संस्थांच्याकडे तंत्रज्ञ आणि कामाच्या साधनांचा अभाव :-

मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या कुशल कामाच्या पूर्ततेसाठी त्या कामातील माहिती असणारे तंत्रज्ञ आणि या कामासाठी लागणारी अत्यावश्यक साधने यांची आवश्यकता असते. परंतु कवठे महांकाळ तालुक्यातील या मजूर सहकारी संस्थांकडे स्वत:च्या मालकीची अशी साधने व तंत्रज्ञ नाहीत. त्यामुळे कुशल कामे मिळण्यास व ती पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत. म्हणूनच या मजूर सहकारी संस्थांना सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघाने तंत्रज्ञ आणि अवजड साधनांचा पुरवठा करावा.

१५. योग्य नेतृत्वाचा अभाव :-

कवठे महांकाळ सारख्या दुष्काळी तालुक्यात मजूर सहकारी संस्थांच्या विकासाला भरपूर वाव आहे. पण यासाठी या तालुक्यात मजूरांची काळजी असणारे, कामाचे ज्ञान व अनुभव असणारे, तांत्रिक ज्ञान असणारे, सेवावृत्ती असणारे निस्वार्थी नेतृत्व उदयास आले पाहिजे. परंतु प्रत्यक्षात या तालुक्यात मजूर सहकारी संस्थांना अशा प्रकारचे नेतृत्व मिळू शकलेले नाही. अशा नेतृत्वाचा मजूर सहकारी संस्थांच्यामध्ये अभाव दिसून येतो.

कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांच्यामध्ये काही दोष आढळून येत असले तरी केवळ टीका - टीपणी करण्यापेक्षा या मजूर सहकारी संस्थाबद्दल अशा दिशेने विचार करणे गरजेचे आहे की ज्यामुळे, या मोठया प्रमाणात कार्यरत बनतील.

तसेच या मजूर सहकारी संस्थांच्या ज्या अडचणी व समस्या आहेत त्यांची सोडवणूक करून त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. कारण -

[१] मजूर सहकारी संस्थांच्या साहयाने मोठया प्रमाणात ग्रामीण भागातील श्रम शक्तीचे संघटन करता येते.

[२] मजूर सहकारी संस्थांच्या मार्फत ग्रामीण भागातील संघटीत केलेली श्रम शक्ती ही ग्रामीण भागांचा विकास व पुनर्निर्मिती करण्यात कारणीभूत ठरते.

[३] मजूर सहकारी संस्था या अनेक अकुशल, अर्धकुशल ग्रामीण मजूरांच्या मध्ये आर्थिक सामाजिक बदल करू शकतात. आणि

[४] समाजांतील आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या अनेक मजूरांचा उध्दार करण्यासाठी मजूर सहकारी संस्था उपयोगी ठरतात.

***